संक्षिप्त

‘धन्यवाद’ कवी संवाद

नाशिक : येथील गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित ‘पुस्तकावर बोलू काही’ या उपक्रमात १८१ वे पुष्प ‘धन्यवाद’ या पुस्तकावर युवा कवी माणिकराव गोडसे यांनी गुंफले. अध्यक्षस्थानी सावळीराम तिदमे होते. यावेळी गोडसे यांनी, कविता प्रत्येकाच्या जीवनात दिलासा देत असते, असे सांगितले. सामाजिक बांधीलकी असलेल्या साहित्यातून जीवनाला एक आयाम प्राप्त होतो. समाजातील व्यंगावर आणि शोषणावर कोरडे ओढणाऱ्या कवितांचा धन्यवाद काव्यसंग्रहात समावेश आहे. नवा समाज, माणसास जाणणारा माणूस, माणुसकी सांभाळणारा असावा, असा आशावाद जागवण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी सांगितले. संग्रहातील काही कविता त्यांनी सादर केल्या. सुनीता वाळुंज आणि वैजयंती सिन्नरकर यांना ग्रंथभेट देण्यात आली. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले. अशोक कुमावत यांनी आभार मानले.

भरती घोटाळ्यात तिघांना अटक

मालेगाव तालुक्यातील दोन प्रकरणे; शिक्षणाधिकाऱ्यास अटक

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : सेवाज्येष्ठता डावलून नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षकांना १३ वर्षापासून कार्यरत असल्याचे भासवत शासनाची दोन कोटी ६९ लाख ५६ हजार रुपयांना फसवणूक केल्याप्रकरणी येथील पवारवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या प्रकरणी नाशिक जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचा शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील आणि कार्यालयीन अधीक्षक सुधीर पगार या दोघांना नाशिकच्या आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. तसेच येथील या. ना. जाधव विद्यालयातील भरती घोटाळ्याप्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दुसऱ्या एका गुन्ह्यात उपशिक्षणाधिकारी उदय देवरे यालादेखील अटक झाली आहे.

जैनब मोहम्मद या शिक्षिकेने दिलेल्या तक्रारीनुसार पवारवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. जैनब आणि सीमा तरन्नुम निहाल अहमद या दोघी २०१३ पासून मालेगाव हायस्कूलमध्ये उपशिक्षिका म्हणून विनाअनुदानित तत्त्वावर कार्यरत होत्या. या दोन्ही शिक्षिकांना २०२३ मध्ये २० टक्के अनुदान तत्वावर घेण्यात आले. त्यानंतर याच शाळेत जून २०२४ मध्ये नोकरीस लागलेले अन्य १३ शिक्षक २०१२ ते २०२१ या कालावधीत या शाळेत सेवेत असल्याचे बनावट कागदपत्र तयार करून शिक्षण अधिकाऱ्यांकडे संच मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आले. त्यानुसार प्रस्ताव मंजूर झाल्याने या १३ शिक्षकांना १०० टक्के अनुदान लागू झाले.

या शिक्षकांच्या मागील तारखेपासून दाखविलेल्या सेवेमुळे थकीत वेतनापोटी दोन कोटी ६९ लाख ५६ हजार १९४ रुपये पदरात पाडून घेतले, त्यामुळे शासनाची आणि आम्हा दोघा शिक्षिकांची फसवणूक झाल्याचे जैनब मोहम्मद यांनी तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणी पोलिसांनी अंजुमन मोईनु तुलबा संस्थेचा चालक मोहम्मद इसाक खलील अहमद, प्राचार्य जाहिद हुसेन, लिपिक नासिर हुसेन, वरिष्ठ लिपिक अबू हुरेरा आणि महापालिका शिक्षण मंडळ शाळेतील शिक्षक नवीद अख्तर आदींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यातील नवीन अख्तर याने या प्रकरणात दलालाची भूमिका निभावल्याचा संशय आहे. त्याच्या विरोधात अशाच प्रकारची फसवणूक केल्याचे अन्य गुन्हे यापूर्वी दाखल आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनाने त्याला सेवेतून निलंबित केले आहे.

लोकमान्य विद्यालय भरती घोटाळा

काही दिवसांपूर्वी येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या लोकमान्य विद्यालयात कर्मचारी भरती घोटाळ्याचे प्रकरण उघडकीस आले होते. त्यासंदर्भात संस्थाचालकांसह अन्य तीन जणांविरोधात छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील चारही संशयित फरार आहेत. या प्रकरणात कर्मचारी भरतीला मान्यता देताना जिल्हा परिषदेतील उपशिक्षणाधिकारी उदय देवरे याचाही सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने आर्थिक गुन्हे शाखेने मंगळवारी रात्री त्याला अटक केली. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक आर.एस.सुर्वे हे अधिक तपास करीत आहेत.

धुक्यातील वाट...

काही दिवसांपासून शहर परिसरात सुरू असलेल्या संततधार पावसाने तीन दिवसांपासून विश्रांती घेतली आहे. बुधवारी पहाटे तर शहराच्या अनेक भागांत धुके पडले होते. एरवी असे चित्र नाशिकमध्ये हिवाळ्यात कायम दिसत असते. (छायाचित्र : यतीश भानू)

आंतरराज्य टोळीकडून मेंढ्यांची चोरी

राजस्थानातून संशयित ताब्यात

नाशिक : सिन्नर तालुक्यात मेंढ्या चोरी करणाऱ्या टोळीतील आंतरराज्यीय गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. तालुक्यात मेंढ्या चोरीचे चार गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी राजस्थानात जाऊन संशयिताला अटक केली.

गुन्हेगार हे राजस्थानातील असल्याचे समजल्यानंतर राजस्थानातील कोटा येथे सलग चार दिवस संशयिताच्या हालचालींवर पाळत ठेवून रावल उर्फ राहुल बंजारा (२१, रा. कछालिया, राजस्थान) याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्याची कबुली दिली. संशयित अब्दुल बारी (रा. कोटा), राजु बंजारा, लक्ष्मण बंजारा, किसन बंजारा, चिंटु बंजारा, बिन्टु बंजारा (रा. कछालिया, राजस्थान) यांच्या मदतीने चोरी केल्याचे त्याने सांगितले. मागील महिन्यात सिन्नर तालुक्यातील मनेगाव, दोडी, दुशिंगवाडी, धोंडवीरनगर तसेच राहता तालुक्यातील देर्डे, कोऱ्हाळे परिसरात मेंढपाळांच्या सुमारे ९० मेंढ्या चोरीस गेल्या होत्या. सिन्नर, वावी येथे यासंदर्भात चार गुन्हे दाखल झाल्यावर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी पोलीस पथक नेमले होते.

रावल याची कबुली

रावल हा सराईत गुन्हेगार असून त्याची टोळी बकरी पालनाचा व्यवसाय करत असल्याने त्याला मेंढपाळ, बकरी पालनातील बारकावे माहिती होते. तो मेंढ्यांच्या कळपाबाबत माहिती घेत सिन्नर तालुक्यात आल्याचे तपासात उघड झाले. टोळी दिवसा मेंढपाळ वस्त्यांवर पाहणी करुन रात्री चारचाकी वाहनांमधून येत मेंढ्यांची चोरी करत. अब्दुल बारीमार्फत चोरलेल्या मेंढ्यांची विक्री करुन मिळालेले पैसे आपापसात वाटून घेतल्याची कबुली रावलने दिली.

महाराजस्व अभियानात भरगच्च उपक्रमांची तयारी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : शिव, पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण, शेत रस्त्यांची मोजणी आणी सीमांकन, सर्वांसाठी घरे उपक्रमात घर बांधण्यासाठी शासकीय जमीन प्रदान करणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे, स्मशानभूमीसाठी उपलब्ध जागांचे प्रस्ताव, स्वच्छता अभियान, महसूल अदालत, असे विविध उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राबविण्याची तयारी प्रशासनाने केली आहे.

जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती सभागृहात बैठक पार पडली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दोन ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. सर्व शासकीय यंत्रणांनी या सेवा पंधरवड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

सेवा पंधरवड्यात महसूल विभागाने केलेल्या नियोजन आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. तीन टप्प्यांत ते राबविले जाणार असल्याचे अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात पाणंद रस्तेविषयक मोहिम घेण्यात येणार आहे. यात शिव, पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण भूमी अभिलेख व उपअधिक्षक (भूमी अभिलेख) यांच्या समन्वयातून केले जाणार आहे. यात शेत रस्त्यांची मोजणी, नोंदी, सीमांकन, रस्त्यांसाठी विशिष्ट सांकेतांक निश्चित करणे व पाणंद रस्ते गाव नकाशावर चिन्हांकित करणे ही कार्यवाही केली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात २३ ते २७ सप्टेंबर या कालावधीत सर्वांसाठी घरे हा उपक्रम राबविला जाईल. यात घरे बांधण्यासाठी वाटपास उपलब्ध असलेली शासकीय जमीन कब्जेहक्काने प्रदान करणे, शासकीय जमिनीवर असलेली अतिक्रमणे नियमातील तरतूदीनुसार नियमानुकूल करणे, अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी आरक्षण बदलाचे प्रस्ताव सादर करणे, अ,ब, क, ड प्रस्ताव नाहरकत दाखल्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविणे, अशी कार्यवाही केली जाणार आहे.

तिसऱ्या टप्प्यात २८ सप्टेंबर ते दोन ऑक्टोबर या कालावधीत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातील. गटविकास अधिकाऱ्यांना स्मशानभूमीसाठी उपलब्ध जागांचे प्रस्ताव ना-हरकत दाखल्यांसह सादर करावयाचे आहेत. अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींचे आयुष्यमान कार्ड काढणे, रेशनकार्ड माहिती ऑनलाईन करणे, स्वच्छता अभियान, महसूल अदालत, वनपट्टे दाव्यांची कार्यवाही व वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

आज सावाना शिक्षक गौरव सोहळा

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : येथील सार्वजनिक वाचनालय आणि नागरिक शिक्षक गौरव समिती यांच्या वतीने गुरूवारी सायंकाळी पाच वाजता ५५ वा शिक्षक गौरव सोहळा परशुराम साईखेडकर नाट्यगृहात होणार आहे. राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते पुरस्कारार्थींना गौरविण्यात येणार आहे.

अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके राहणार आहेत. पुरस्कार सोहळ्यात योगेश सूर्यवंशी, अविनाश पवार, अनुराधा बस्ते ,ज्योती वालझाडे ,शामल पाटील, विनीत पवार ,वैशाली मुळे, शीला गायधनी, संजय डेरले ,कुंदा जोशी, अनुराधा नामजोशी, डॉ.नागेश्वर भदाणे, डॉ .अरुण कुमार द्विवेदी, प्रा.सुनिता पाटील ,डॉ.प्रमोद हिरे, गजानन अंभोरे, डॉ. गंधार मंडलिक, श्रीकांत गायकवाड, आनंद अत्रे ,समीर कुलकर्णी, कैलास लवांड, प्रा .छाया लोखंडे, संध्या केळकर, प्रा.सोमनाथ घुले, प्रा.घनश्याम जाधव, प्रा. संध्या खेडेकर यांचा गौरव करण्यात येणार आहे. शिक्षक गौरव सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन सावानाचे उपाध्यक्ष वैद्य विक्रांत जाधव, प्रा. सुनील कुटे, संजय करंजकर, सुरेश गायधनी, सोमनाथ मुठाळ , डॉ. किशोर पवार, राजेंद्र निकम यांनी केले आहे.

गिरणा गौरवतर्फे शिक्षकांचा सन्मान

नाशिक : येथील गिरणा गौरव प्रतिष्ठानच्यावतीने शंकराचार्य कूर्तकोटी सभागृहात आयोजित कार्यक्रमात साने गुरुजी पुरस्काराने शिक्षकांना गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक प्रा. संदीप जगताप यांनी, आपल्या जीवनाला दिशा देत समाज जागृती आणि सदृढ समाजनिर्मितीसाठी शिक्षकांचे सर्वात मोठे योगदान आहे, असे सांगितले. प्रा. जगताप यांनी सादर केलेल्या ‘इन्स्पेक्शन’ या कवितेने उपस्थित गुरुजनांची दाद मिळवली.

मंत्रालयातील अवर सचिव डॉ. नंदकुमार राऊत, विशेष सरकारी वकील विद्या देवरे, साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रवीण जोशी यांनी मनोगत व्यक्त केले.

गिरजा महिला मंचच्या सरचिटणीस भारती निकम, जिल्हाध्यक्षा शितल कुयटे, जिल्हा उपाध्यक्षा भाग्यश्री चौधरी मंचावर उपस्थित होत्या. विविध तालुक्यांमधील शिक्षकांना साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शिक्षकांचा गौरव

सोमनाथ वाघ-त्र्यंबकेश्वर, प्रकाश पाडवी-सुरगाणा, मंगळू गांगुर्डे-कळवण, योगिता गावित-सुरगाणा, पाटीलबुवा माने-मालेगाव, संगीता सूर्यवंशी-देवळा, अनिता देवराज-नांदगाव, भाग्यश्री खैरनार-निफाड, मनीषा गायकवाड-दिंडोरी, सुरेश लिलके-इगतपुरी, संगीता गायधनी-नाशिक, ज्योती ठोंबरे-दिंडोरी, यमुना इम्पाळ-त्र्यंबकेश्वर, सुनंदा गवंडे-चांदवड, कावेरी दांडगे-येवला, आकांक्षा ठाकरे-सटाणा, भाग्यश्री पवार-सुरगाणा, मीनाक्षी रायते-नाशिक, निर्मला पगार-मालेगाव, मेघावती आखाडे-सिन्नर, रंजना सोनवणे-सटाणा, भारती ठाकरे-देवळा, वैशाली मिंचे-निफाड, सुमन गावडे-त्र्यंबकेश्वर, नरेंद्र पाटील-पेठ, बाबासाहेब बेरगळ-येवला, प्रदीपकुमार रसलपूरकर-नाशिक, मनोज डोंगरे-नांदगाव, उमेश बोरसे-नांदगाव, हरिश्चंद्र भोये-नाशिक, संतोष अहिरे-सटाणा, लक्ष्मण थवील-सुरगाणा, सुभाष सोनवणे-सुरगाणा, भूषण पाटील-सटाणा, उमेश जाधव-पेठ, विश्वास वाघमारे-नाशिक, पांडुरंग वाघमारे-सुरगाणा, संजय काळे-इगतपुरी, मार्तंड जाधव-त्र्यंबकेश्वर, पंकज पवार-नाशिक .

मनमाड यार्डचे आधुनिकीकरण

लोकसत्ता वार्ताहर

मनमाड : मनमाड ते जळगाव तिसरी मार्गिका प्रकल्पांतर्गत मनमाड रेल्वे स्थानक यार्डचे आधुनिकीकरण यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे. हे काम केवळ १३ तासांच्या विक्रमी वेळेत पूर्ण करून रेल्वे वाहतुकीत अधिक सुलभता, लवचिकता आणि कार्यक्षमतेची भर घालण्यात आली आहे.

या कामांतर्गत काही महत्त्वाची सुधारणा करण्यात आली. नवीन मार्गाची भर, १२३ विद्यमान मार्गांची पुनर्रचना, दौंड-मनमाड यार्ड दरम्यान नवीन क्रॉसओव्हरची जोडणी, थेट मालवाहतुकीची सुविधा, त्यामुळे गाड्यांची गर्दी कमी होणार असून प्रवासी गाड्यांसाठी अधिक लवचिकता व वेळेवर धावण्याची सोय झाली आहे.

मनमाड हे मध्य रेल्वेवरील एक महत्त्वाचे जंक्शन स्थानक असून मालगाड्या, प्रवासी गाड्यांच्या दृष्टीने ते एक अत्यंत महत्त्वपूर्ण केंद्र आहे. यार्ड आधुनिकीकरणामुळे मालगाड्यांची थेट हाताळणी अधिक सुरळीत होणार असून, प्रवासी गाड्यांच्या वेळेच्या काटेकोरपणात आणि विश्वासार्हतेत लक्षणीय सुधारणा होणार आहे.

मध्य रेल्वेने केलेल्या या पायाभूत सुविधांच्या उन्नतीमुळे प्रवासी व उद्योग क्षेत्र दोघांनाही मोठा फायदा होणार आहे.

मनमाड - जळगाव तिसरी मार्गिका प्रकल्प हा मध्य रेल्वेसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, या प्रकल्पामुळे माल व प्रवासी वाहतूक अधिक कार्यक्षम, जलद व सुरक्षित होणार आहे.

pnb Housing Finance Limited

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफेसी अॅक्ट) अंतर्गत पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.च्या ताब्यात असलेल्या स्थावर मत्तेची खासगी करार विक्रीद्वारे विक्रीची सूचना.

सुनिल बद्रिनारायण सारस्वत / पुनम सुनिल सारस्वत- निवासी पत्ता : फ्लॅट नं. ०५, दुसरा मजला, जय कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ३९४, छोटू एस टेलरच्या वरती, पेठे स्कूलच्या मागे, एम. जी. रोड, नाशिक, नाशिक-४२२ ००१, महाराष्ट्र, भारत.

एलएएन : HOU/NSK/1217/468497

शाखेचा पत्ता : पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि., ऑफिस नं. ४०७ व ४०८, ४था मजला, पद्म विश्व लॅण्डमार्क, तनिष्क शोरूमजवळ, अॅक्सिस बँकेच्या वरती, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२ ००२, महाराष्ट्र.

प्राधिकृत अधिकारीचा तपशील : नाव : कल्पेश तपकिरे, शाखेचा फोन नं. : ०२५३२३११६७१, ई-मेल आयडी : Kalpesh.tapkire@pnbhousing.com मोबा. नं. : ९२८९७९४०२३, लॅण्डलाइन नं. (कार्यालय) : ०२५३२३११६७१

२७ सप्टेंबर, २०२५ रोजी अंमलबजावणी करावयाचा खासगी करार

खरेदीदार ओळखला

पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सरफेसी अॅक्ट, २००२च्या सेक्शन १३(४) अंतर्गत अनुसूचिबद्ध मालमत्तेचा ताबा घेतला आहे. जाहीर बोली मागवून लिलावाचे सर्व मागील प्रयत्न निष्फळ ठरले. म्हणून, आम जनतेस कळविण्यात येत आहे की, अनुसूचीत नमूद केल्यानुसार सुरक्षित मत्ता, खासगी करारामार्फत मालमत्तेच्या विक्रीकरिता मानक शर्ती व अटींनुसार **‘‘जसे आहे जेथे आहे’’ व ‘‘जसे आहे जे काही आहे’’** या तत्त्वावर देणींच्या वसुलीकरिता पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.करिता मान्य असलेल्या शर्तींनुसार खासगी कराराद्वारा विक्रीकरिता उपलब्ध आहे :

१. खासगी कराराद्वारा विक्री **‘‘जसे आहे जेथे आहे’’ व ‘‘जसे आहे जे काही आहे’’** या तत्त्वावर असणार आहे. म्हणून जाहीर बोलींना निमंत्रण देण्यात येणार नाही.
२. सदर खरेदीदाराने मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्तावाच्या स्वीकृतीवर कामकाजाच्या पुढील दिवशी विक्री विचाराधीन २५% ठेव भरणे आवश्यक आहे आणि उर्वरित रक्कम त्यानंतर १५ दिवसांच्या आत भरावयाची आहे.
३. खरेदीदाराने अर्जासमवेत प्रस्तावित रकमेच्या १०% ठेव जमा करावयाची आहे, जी वरील खंड (२)नुसार भरावयाच्या ठेवीच्या २५%नुसार समायोजित केली जाईल.
४. खंड (२) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार रक्कम भरण्यास असमर्थ ठरल्यास, अर्जासमवेत प्रदान केलेल्या रकमेच्या १०% समाविष्ट आधीच प्रदान केलेली रक्कम जप्त होईल.
५. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.द्वारा खरेदीच्या प्रस्तावाची स्वीकृती न झाल्यास, कोणत्याही व्याजाशिवाय अर्जासमवेत प्रदान केलेली १०% रक्कम परत केली जाईल.
६. मालमत्तेची विक्री पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.ला ज्ञात असलेल्या किंवा ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान व भावी भारासमवेत करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/ हक्क/ देणींकरिता कोणत्याही स्थितीत जबाबदार असणार नाहीत.
७. खरेदीदाराने त्याच्या समाधानार्थ मालमत्तेसंबंधित (खासगी कराराद्वारा विक्रीअंतर्गत असलेली) सर्व बाबतीत यथावकाश चौकशी करावी. खरेदीदार नंतरच्या तारखेस या संबंधित प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनकोविरोधात कोणताही दावा करण्यास हक्कदार नसेल.
८. पीएनबीएचएफएल कोणतेही कारण न देता खरेदीचा कोणताही प्रस्ताव नामंजूर करण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.
९. एकापेक्षा अधिक प्रस्ताव असल्यास, पीएनबीएचएफएल उच्चतर प्रस्ताव स्वीकारील.
१०. स्वारस्य असलेले पक्षकार त्यांचे अर्ज सादर करण्यासाठी आणि अधिक तपशील/ स्पष्टीकरणांकरिता प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधू शकतील.
११. खरेदीदाराने मालमत्तेच्या खरेदीसंबंधित स्टॅम्प ड्युटी, नोंदणी शुल्क व अन्य खर्च, कर, ड्युटीज सोसावयाची आहेत.
१२. विक्रीचे आयोजन सरफेसी अॅक्ट/ रुल्सच्या तरतुदींनुसार असणार आहे.

अनुसूची : राखीव किंमत (रु.) (त्याखाली मालमत्तेची विक्री केली जाणार नाही) रु. ९,६४,०००/- (रुपये नऊ लाख चौसष्ट हजार फक्त)
मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट नं. ०५, दुसरा मजला, जय कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ३९४, छोटू एस टेलरच्या वरती, पेठे स्कूलच्या मागे, एम. जी. रोड, नाशिक-४२२ ००१, महाराष्ट्र. एकूण रु. ९,६४,०००/- (रुपये नऊ लाख चौसष्ट हजार फक्त)

दिनांक : ०९.०९.२०२५, स्थळ : नाशिक
पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.करिता (प्राधिकृत अधिकारी)

SBI State Bank of India

शाखा - एसएआरबी ठाणे ११६९७ : पहिला मजला, प्लॉट नं. ए-११२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, सर्कल रोड नं. २२, ठाणे (पश्चिम)-४०० ६०४. शाखेचा ई-मेल आयडी : sbi.11697@sbi.co.in

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना परिशिष्ट-IV-ए [रुल ८ (६)च्या तरतुदी पाहा)]

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारा आम जनतेस तसेच विशेषकरून ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण आहे/ ताब्यात आहे. सदर स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा स्टेट बँक इंडियाच्या, सुरक्षित धनको, प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे. सदर मालमत्तेची विक्री **श्री. पंढरीनाथ देवराम पगार व श्रीमती जयश्री पंढरीनाथ पगार यांच्याकडील सुरक्षित धनकोकरिता देय रकमेवरील पुढील व्याज, आनुषंगिक खर्च व किंमत यासह ०२.०३.२०२० रोजीप्रमाणे रु. ८६,२१,४३६.०० (रुपये शहाऐंशी लाख एकवीस हजार चारशे छत्तीस फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता **३०.०९.२०२५ रोजी** ‘‘जसे आहे जेथे आहे’’, ‘‘जसे आहे जे काही आहे’’ व ‘‘जे काही आहे तेथे आहे’’ या तत्त्वावर करण्यात येणार आहे. **राखीव किंमत रु. ६८,००,०००/- व इसारा रक्कम ठेव रु. ६,८०,०००/- असणार आहे.**

स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेस बाधक ठरणारे दावे/ हक्क/ सोसायटी/ बिल्डर्सची देणी आणि लिलावावर ठेवलेल्या मालमत्तेचा भार, नामाधिकार या संबंधित स्वतः स्वतंत्र चौकशी केली पाहिजे. या संबंधित, ई-लिलाव जाहिरात बँकेची कोणतीही बांधिलकी किंवा कोणतेही प्रतिनिधित्व सिद्ध होत नाही व मानीव ठरले जाणार नाही.

बोलीदारांनी लिलाव तारखेपूर्वी मेसर्स बीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडद्वारा रीतीनुसार आवश्यक केवायसी कागदपत्रे व नोंदणी शुल्काची तरतूद करून **https://baanknet.com** यावर स्वतःची नोंदणी केली पाहिजे.

जाहीर ई-लिलावाची तारीख व वेळ प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित विस्तार खंडासह **३०.०९.२०२५ रोजी स. ११.०० वा.पासून ते दु. ०२.०० वा.पर्यंत.**

मालमत्तेचा तपशील / मालमत्ता आयडी नं.	राखीव किंमत (रु.त)	इसारा रक्कम ठेव (रु.)	बोलीवृद्धी रक्कम (रु.)	पाहणीची तारीख व वेळ
फ्लॅट नं. बी-४०१, बी विंग, ४था मजला, ‘ऋतुराज ओएसीस अपार्टमेन्ट’, प्लॉट नं. बी ३३ + बी ३४, सर्व्हे नं. ३५/८ + ३५/९, रामेश्वर नगर, अमय बंगलोच्या बाजूला, गंगापूर रोडलगत, नाशिक-४२२ ०१३. (मालक- श्री. पंढरीनाथ देवराम पगार). एकूण मोजमापाचा एरिया ८१.३१ चौ.मी., नियतवाटप केलेला टॉप एरिया ८७.३६ चौ.मी. यासह व नियतवाटप केलेला पार्किंग एरिया १५०.०० चौ.फू.. **मालमत्ता आयडी नं. : SBIN20002254008**	रु. ६८,००,०००/-	रु. ६,८०,०००/-	रु. १०,०००/-	२५.०९.२०२५ रोजी दु. ०१.०० ते दु. ०२.००

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया **www.sbi.co.in, https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others** या स्टेट बँक ऑफ इंडिया सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर आणि **https://baanknet.com** या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी किंवा संपर्क साधावा- **श्री. प्रणेश ठाकूर, सीएलओ मोबा. नं. ७०८७४३८९९९ व श्री. बिपीन कुमार सिंह, सीओ मोबा. नं. ९७०२४७९७४१.**

स्वाक्षरी/-
दिनांक : ०९.०९.२०२५ **प्रणेश ठाकूर,**
स्थळ : ठाणे **मुख्य व्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया**

भावपूर्ण श्रध्दांजली

स्व.इंदिराताई बळीरामजी हिरे

जन्म -दि. १५ जुलै १९३९ स्वर्गवास - दि. २ सप्टेंबर २०२५

- शोकाकुल -

प्रसाद बळीरामजी हिरे
चि.प्रणव प्रसाद हिरे
डॉ.सुचेता अशोक बच्छाव
सौ. गीतांजली प्रसाद हिरे
कु. प्रांजली प्रसाद हिरे
डॉ. नीता उर्मिल शुक्ला
समस्त हिरे परिवार

कै.भा.हिरे स्म.समिती ट्रस्ट मा.कॅम्प • इंदिरा महिला सह.बँक मालेगाव • इंदिरा महिला पतसंस्था मालेगाव

दशक्रिया विधी - गुरूवार, दि.११/९/२०२५ रोजी सकाळी ९ वा.
स्थळ - इंद्रप्रस्थ, कॉलेज रोड, मालेगांव कॅम्प, ता.मालेगांव (नाशिक)

डीसीबी बँक लिमिटेड
३०२, सेल्लो प्लॅटिना, एफ. सी. रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५.
DCB BANK

ताबा सूचना

डीसीबी बँक लि.चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट (२००२चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रकमेवरील पुढील व्याजासह याखालील तालिकेत अधिक सविस्तरपणे दिल्यानुसार सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणको **(ऋणको व सह-ऋणको)** यांच्यावर फर्माविणारी खाली नमूद केलेल्या तारखांदिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे.

ऋणको आणि सह-ऋणको रकमेचे प्रदान करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको, सह-ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारींनी **०९.०९.२०२५** रोजी सिक्युरिटी इंटरेस्ट रुल्स २००२च्या रुल ८ यासह वाचलेल्या अॅक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (४) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष** ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणको, सह-ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये (स्थावर मालमत्तेचे वर्णन) आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार याखाली नमूद केल्यानुसार संबंधित रकमेकरिता डीसीबी बँक लि.च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता अॅक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहेत.

मागणी सूचना दिनांकित	१७.११.२०२३
ऋणको व सह-ऋणकोचे नाव	१. श्री. रोहीत दिलीप परदेशी २. श्रीमती विजया दिलीप परदेशी ३. श्री. रुतिक दिलीप परदेशी
लोन अकाऊन्ट नंबर	DRHLNAS00563567
एकूण थकीत रक्कम	रु. २५,३१,९४६/- (रुपये पंचवीस लाख एकतीस हजार नऊशे शेहेचाळीस फक्त) ०४.०९.२०२५ रोजीप्रमाणे व्याज व एफसी आकार वगळता.
स्थावर मालमत्तेचे वर्णन	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : मालमत्ता धारण केलेला रेव्हेन्यू सर्व्हे नं. १०५/२, त्यावर बांधकाम केलेले, महाराष्ट्र हाऊसिंग अॅण्ड एरिया डेव्हलपमेन्ट अॅथोरिटी (म्हाडा) म्हणून ज्ञात असलेली स्कीम, धारण केलेला प्लॉट नं. १७, एलआयजी स्कीमअंतर्गत, असलेला प्लॉटेड एरिया मोजमापाचा ३०.०० चौ.मी. बांधकामासह, असलेला तळमजला एरिया मोजमापाचा १८.०० चौ.मी. व पहिला मजला एरिया मोजमापाचा १२.०० चौ.मी. म्हणजेच एकूण बिल्ट-अप एरिया मोजमापाचा ३०.०० चौ.मी. व येथे स्थित- व्हिलेज चुंचले, ता. व जि. नाशिक आणि पुढीलप्रमाणे सीमित : पूर्व : प्लॉट नं. ०६, पश्चिम : ४.५० मी. कॉलनी रोड, दक्षिण : प्लॉट नं. १८, उत्तर : प्लॉट नं. १६ (सुरक्षित मत्ता).

दिनांक : ११.०९.२०२५ डीसीबी बँक लि.करिता
स्थळ : नाशिक प्राधिकृत अधिकारी

HeroHousing Finance

हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
संपर्क पत्ता : ए-१०९ व ११०, पहिला मजला, प्रथमेश प्लाझा, आरएसीसीए कॉलनी, सहारणपूर रोड, नाशिक, मुंबई सिटी, महाराष्ट्र-४२२ ००२.
नोंदणीकृत कार्यालय : ०९, कम्युनिटी सेन्टर, बसंत लोक, वसंत विहार, नवी दिल्ली-११० ०५७,
फोन : ०११ ४९२६७०००, टोल-फ्री नं. : १८०० २१२ ८८००, ई-मेल : customer.care@herohfl.com
वेबसाइट : www.herohousingfinance.com । सीआयएन : यू६५१९२डीएल२०१६पीएलसी३०१४८

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)
(सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट रुल्स, २००२च्या रुल ८(१) यासह वाचलेल्या परिशिष्ट IV नुसार)

ज्याअर्थी, हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणकोंवर फर्माविणारी याखाली नमूद केल्यानुसार मागणी सूचना निर्गमित केल्या आहेत. ऋणको रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरले आहेत. विशेषकरून ऋणकोंना तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त अॅक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणको व आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार याखाली नमूद केलेल्या तारखेपासून रकमेवरील व्याज व दंडात्मक व्याज, आकार, किंमत इ.सह याखालील संदर्भित रकमेकरिता हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे. **सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता अॅक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहेत.**

लोन अकाऊन्ट नं.	बंधनग्रहिता/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधीचे नाव	मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेनुसार रक्कम	ताब्याची तारीख (विधायक/ प्रत्यक्ष)
HHFNSKHOU24000050195, HHFNSKIPL24000050208	सुनिल दिलीप निरभावणे, शुभांगी सुनिल निरभावणे	१२.०६.२०२५ रु. १४,३४,५७७/- १०.०६.२०२५ रोजीप्रमाणे	०८.०९.२०२५ (सांकेतिक)

सुरक्षित मत्ता/स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- फ्लॅट नं. सी-७-७०३, ७व्या मजल्यावरील, सी विंग, सर्व्हे नं. ४३/२बी/२ व ४३/२बी/१ए/२, म्हाडा बिल्डिंग, पंचक नाशिक, ईडब्ल्यूएस स्कीमअंतर्गत ‘महाराष्ट्र हाऊसिंग अॅण्ड एरिया डेव्हलपमेन्ट अॅथोरिटी’ (म्हाडा) म्हणून ज्ञात असलेल्या स्कीम, त्यावरील बांधकाम केलेले, मोजमापाचा एरिया ४४.८९ चौ.मी., राहुल नगर, ब्रिज नगर, ठाकरे माळा, मारुती मंदिराजवळ, जेल रोड, पंचक शिवार, **ता. व जि. नाशिक येथे स्थित. सीमा : पूर्व-** मार्जिनल स्पेस, **पश्चिम-** फ्लॅट नं. सी-७०५, **दक्षिण-** बी विंग, **उत्तर-** स्टेअरकेस पॅसेज व फ्लॅट नं. सी-७०२.

दिनांक : ११.०९.२०२५, **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**
स्थळ : नाशिक **हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकरिता**

सत्यमेव जयते

फॉर्म क्र.१४ [नियमन ३३(२) पहा]
नोंदणीकृत ए/डी द्वारे, दस्ती फेल, जे प्रकाशनाद्वारे

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)
१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्स्चेंज बिल्डिंग, सेक्टर-३०ए, वाशी, नवी मुंबई- ४००७०३

मागणी सूचना
कर्ज वसुली आणि दिवाळखोरी कायदा, १९९३ च्या कलम २५ ते २८ आणि आयकर कायदा, १९६१ चे दुसरे परिशिष्ट याचा नियम २ अंतर्गत सूचना
आरआर क्र. ४४, २०२४
बँक ऑफ महाराष्ट्र
विरुद्ध
श्री. ज्ञानेश्वर संतू आहेर

प्रति,
यांचे कायदेशीर वारस
(सीडी ३). श्री.दत्तात्रय संतू आहेर (मृत) पोस्ट येथे: म्हैलुस्के, ता-दिंडोरी, जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र-४२२ २०२.

१. सदर हे सूचित करण्यात येते की, **ओए/९७४/२०१८** यामध्ये पीठासीन अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशांनुसार जारी केलेल्या वसुली प्रमाणपत्रानुसार, **कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)** रक्कम **रु. २०,७८,७५८.०० (रुपये वीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार सातशे अठ्ठावन्न फक्त)** पेंडेंट लाइट आणि भविष्यातील व्याजासह @०७.००%, दि. ०८.०५.२०१८ रोजीपासून वसूल होईपर्यंत आणि खर्च **रु. ४८,००५/- (रुपये अठ्ठेचाळीस हजार पाच फक्त)** प्रमाणपत्र कर्जदारांच्या कायदेशीर वारसांना-३ विरुद्ध संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे इतर प्रतिवादींसह देय झाले आहे.
२. तुम्हाला सूचना मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत वरील रक्कम भरण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, अन्यथा बँका आणि वित्तीय संस्थांकडून देय असलेल्या कर्जाच्या वसुलीचा कायदा, १९९३ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार वसुली केली जाईल.
३. तुम्हाला पुढील सुनावणीच्या तारखेला किंवा त्यापूर्वी तुमच्या मालमत्तेचा तपशील प्रतिज्ञापत्रावर जाहीर करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.
४. पुढील कार्यवाहीसाठी तुम्हाला दि. ३०.०९.२०२५ रोजी दुपारी २.३० वाजता निम्नस्वाक्षरीकार यांच्यासमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात येत आहेत.
५. वरील रकमेव्यतिरिक्त, तुम्ही देय देण्यासदेखील जबाबदार असाल :-
   (अ) प्रमाणपत्र/अंमलबजावणीच्या कार्यवाहीच्या या सूचनेनंतर लगेच सुरू होणाऱ्या कालावधीसाठी देय असलेले व्याज.
   (ब) सदर या सूचनेची पूर्तता करण्यासाठी आलेले सर्व खर्च, शुल्क आणि खर्च, वॉरंट आणि इतर प्रक्रिया, आणि देय रक्कम वसूल करण्यासाठी घेतलेल्या इतर सर्व कार्यवाही.

सदर दिनांकित : ०१.०८.२०२५ रोजी न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने आणि माझ्या हाती दिले.

सही/-
शिक्का
(दीपा सुब्रमण्यम)
वसुली अधिकारी- २
कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी/ ३)